-: प्रेसनोट दिनांक- ०६/०७/२०२० :-

**सागर आनंदराव शिगावकर, वय ३६, लिपीक - जमिन संकलन, उपविभागीय अधिकारी कार्यालय, कागल-राधानगरी उपविभाग, कोल्हापूर, वर्ग-३, रा. ८७३, सी वॉर्ड, उमा टॉकीज जवळ, रविवार पेठ, कोल्हापूर यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार यांनी हमीदवाडा ता. कागल या ठिकाणी गट नंबर २१६ मधील २० गुंठे जमीन त्यांची आई व बहिणीचे नांवे सन-२०११ मध्ये खरेदी केली होती. त्यामधील साडेनऊ गुंठे जमीन सन-२०१५-१६ मध्ये चार जणांना विकली. त्यापैकी ९ गुंठे जमीन घेणा-यांची नांवे ७/१२ पत्रकी नोंद झाली. परंतू उर्वरीत अर्धा गुंठयांच्या जमीनीचा अर्थबोध होत नाही या कारणामुळे त्या अर्धा गुंठयाच्या खरेदीदार सौ. व श्री. कुंभार यांच्या नावांची नोंद ७/१२ पत्रकी झाली नाही. त्यामुळे तक्रारदार व खरेदीदार सौ. व श्री. कुंभार असे हमीदवाडा गावचे तलाठी नितीन पाटील यांचेशी संपर्क सांधून त्यांना भेटले. तेव्हा त्यांनी रितसर अर्ज देण्यास सांगितल्याने सौ व श्री कुंभार यांनी सदर जमीनीच्या ७/१२ पत्रकी फेरनोंद घालण्यासाठी अर्ज त्यांना अर्ज दिला. त्यावेळी तलाठी पाटील यांनी अर्जावर पोहोच न देता तक्रारदार व सौ. कुंभार यांना सांगितले की, 'तुम्ही प्रांत कार्यालय कागल व राधानगरी, जि. कोल्हापूर याठिकाणी तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याप्रमाणे जमीनीच्या मुल्यांकनाच्या २५ टक्के शासकीय दंड भरुन सदरचा खरेदी-विक्री व्यवहार नियमानुकूल करुन घ्यावा.' त्याप्रमाणे सौ. कुंभार यांनी प्रांत कार्यालय कागल व राधानगरी, जि. कोल्हापूर या ठिकाणी डिसेंबर-२०१९ मध्ये अर्ज केला. त्यांचे अर्जाप्रमाण तहसीलदार व सर्कल यांचेमार्फतीने रितसर कार्यवाही पुर्ण करुन तो अहवाल प्रांत कार्यालयाकडे तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याप्रमाणे जमीनीच्या मुल्यांकनाच्या २५ टक्के शासकीय दंड भरुन सदरचा खरेदी-विक्री व्यवहार नियमानुकूल करावा असा अहवाल सादर केला. त्या आधारे तक्रारदार व सौ. व श्री. कुंभार यांनी प्रांत कार्यालयातील लिपीक सागर शिगांवकर यांची भेट घेतली. त्यावेळी तक्रारदार यांचेशी जमीनीच्या कामाबाबत चर्चा करुन, त्यांनी विक्री केलेल्या जमिनीचा व्यवहार तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याप्रमाणे शासकीय दंड भरुन नियमित करुन देणेसाठी त्यांना १,२०,०००/- रू. मागणी केली व 'पैसे दिले तरच मी तुमचा खरेदी विक्री व्यवहार नियमानुकूल करुन देईन, नाहीतर देणार नाही. मला तुम्ही जर पैसे नाही दिले तर, तुमचा अर्ज हा कागदपत्रे अपुर्ण आहेत असे सांगून, अर्ज निकाली काढीन.' असे सांगितले. त्यामुळे तक्रारदार यांनी खरेदीदार सौ. व श्री. कुंभार यांचेशी चर्चा करून लिपीक शिगावकर यांचेविरूध्द अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार देण्याचे ठरवुन त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लिपीक शिगावकर यांचेविरूध्द तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे आज दिनांक ०६/०७/२०२० रोजी लिपीक सागर शिगावकर यांची प्रांत कार्यालय, राधानगरी-कागल उपविभाग येथे ासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये लिपीक सागर शिगावकर यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी सौ. व श्री. कुंभार यांना खरेदी केलेल्या जमिनीचा व्यवहार हा शासनाच्या तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याप्रमाणे जमिनीच्या मुल्यांकनाच्या २५ टक्के दंड भरून घेवुन प्रांताधिकारी यांचेकडुन नियमित करून तसा आदेश देणेसाठी १,२०,०००/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम एक रक्कमी घेवुन येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार लागलीच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील उपविभागीय अधिकारी, राधानगरी-कागल उपविभाग कार्यालयात सापळा कारवाई आयोजित केली असता, आरोपी लोकसेवक लिपीक सागर शिगावकर यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी सौ. व श्री. कुंभार यांना खरेदी केलेल्या जमिनीचा व्यवहार हा शासनाच्या तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याप्रमाणे जमिनीच्या मुल्यांकनाच्या २५ टक्के दंड भरून घेवुन प्रांताधिकारी यांचेकडुन नियमित करून तसा आदेश देणेसाठी १,२०,०००/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून सागर आनंदराव शिगावकर, वय ३६, लिपीक - जमिन संकलन, उपविभागीय अधिकारी कार्यालय, कागल-राधानगरी उपविभाग, कोल्हापूर, वर्ग-३, रा. ८७३, सी वॉर्ड, उमा टॉकीज जवळ, रविवार पेठ, कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. शाम बुचडे, पोकॉ मयुर देसाई, रूपेश माने व संदीप पडवळ, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**